# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** महाराष्ट्र महानगरपालिका कायद्याच्या तरतुदीनुसार तसेच **{उद्यान व वृक्ष प्रा.विभाग}** वृक्ष जतन व संवर्धन अधिनियम 1975 मधील तरतुदी, शिवाय नगरविकास विभागाच्या 16 जुलै 2021 च्या अधिसुचने नुसार1975 च्या कायद्यात करण्यात आलेल्या सुधारणे नुसार कार्यवाही करण्याची प्राथमिक स्वरूपाची जबाबदारी उद्यान विभागाची आहे. वृक्ष संवर्धनाशिवाय शहरातील सार्वजनीक जागेवरील झुडपी,झाडे, वाहतुकीस व्यत्यय निर्माण करणारी झाडे, रोडवर व फुटपाथवर झाडाच्या झुकलेल्या फांद्या छाटणी करणे तसेच वर नमुद कायद्यातील तरतुदीनुसार अनुमतीदारांना वृक्ष तोडण्याची अनुमती दिल्यानंतर वृक्षाचे बुंधे, फांद्या यांची विल्हेवाट व निघालेल्या कच—याची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी महानगरपालिकेच्या उद्यान विभागाची आहे. या अंतर्गत विषेशतः

1. सार्वजनिक जागा, इमारती वरील झाडाच्या झुकलेल्या फांद्या छाटणी करणे, शिकस्त व उन्मळुन पडलेले वृक्षाची विल्हेवाट लावणे.
2. शहरात विविध ठिकाणी लावण्यात आलेल्या स्ट्रिट लाईट,विद्युततारा, ट्राफीक सिग्नल, CCTVकॅमेरावर आलेल्या फांद्याची छाटणी करणे.
3. म.न.पा शाळा, उद्याने, वाचनालये, अध्ययन कक्ष व अन्य इमारतीवर निघालेली अनावश्यक झाडे झुडपी काढणे व त्याची विल्हेवाट लावणे.

तथापी या प्राथमिक जबाबदारा—या व्यतिरीक्त वर्षभरात येणा—या वादळ वा—यामुळे विशेषतः फरवरी ते मे महीना व मान्सुम पुर्व कालावधी तसेच सप्टेबंर/ऑक्टोबंर मध्ये अवकाळी पाऊस व वादळामुळे शहरातील सार्वजनीक स्थळी व खाजगी परीसरामध्ये वृक्ष उन्मळुन व वृक्षांच्या फांद्या तुटून पडण्याचे प्रमाण अत्याधिक असते. अशा आणिबाणी प्रसंगी सद्यास्थितीत उद्यान विभागाकडे असलेली यंत्रणा ही अपुरी ठरते व परिणामी नागरीकांचा रोष पत्करावा लागतो.

त्यामुळे अश्या आपातकालीन व आणिबाणीच्या परिस्थितीच्या सामना करण्याकरीता उद्यान विभागाकडे केंद्रीय व क्षेत्रीय स्तरावर विकेंद्रीत केलेली सक्षम यंत्रणा असणे आवश्यक आहे. या जाणीवेतुन व गरजेतुन केंद्रीय स्तरावर व प्रत्येक क्षेत्रीय स्तरावर बाहय स्त्रोताव्दारे कुशल व अकुशल मजूर नेमुण वाहनाव्दारे वृक्षांच्या फांद्या पालापाचोळा, लाकडे व मोठी झाडे वाहुन नेण्याकरीता व विल्हेवाट लावण्याकरीता यंत्रणा उभारण्याची बाब विभागाच्या विचाराधीन होती. त्यानुसार केंद्रीय व क्षेत्रीय स्तरावर वर नमुद आणिबाणीच्या प्रसंगी परिस्थीती हाताळण्याकरीता व कार्यालयास प्राप्त तक्रारीचे निराकरण करण्याकरीता विभागाने एकुण रूपये **1,08,43,493/—**चे प्राकलन तयार केले असुन त्यास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे, व लघु आवेदन/निवीदा मागविण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :— 1) खर्च A26001642101 अतंर्गत वर्ष 2023—24
2) सविस्तर टिप्पणी नस्तीत उपलब्ध आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 389/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 29/05/2023**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त (उद्यान), उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत

केल्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका कायद्याच्या तरतुदीनुसार तसेच वृक्ष जतन व संवर्धन अधिनियम 1975 मधील तरतुदी, शिवाय नगरविकास विभागाच्या 16 जुलै 2021 च्या अधिसुचने नुसार1975 च्या कायद्यात करण्यात आलेल्या सुधारणे नुसार कार्यवाही करण्याची प्राथमिक स्वरूपाची जबाबदारी उद्यान विभागाची आहे. वृक्ष संवर्धनाशिवाय शहरातील सार्वजनीक जागेवरील झुडपी,झाडे, वाहतुकीस व्यत्यय निर्माण करणारी झाडे, रोडवर व फुटपाथवर झाडाच्या झुकलेल्या फांद्या छाटणी करणे तसेच वर नमुद कायद्यातील तरतुदीनुसार अनुमतीदारांना वृक्ष तोडण्याची अनुमती दिल्यानंतर वृक्षाचे बुंधे, फांद्या यांची विल्हेवाट व निघालेल्या कच—याची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी महानगरपालिकेच्या उद्यान विभागाची आहे. या अंतर्गत विषेशतः

1. सार्वजनिक जागा, इमारती वरील झाडाच्या झुकलेल्या फांद्या छाटणी करणे, शिकस्त व उन्मळुन पडलेले वृक्षाची विल्हेवाट लावणे.
2. शहरात विविध ठिकाणी लावण्यात आलेल्या स्ट्रिट लाईट,विद्युततारा, ट्राफीक सिग्नल, CCTVकॅमेरावर आलेल्या फांद्याची छाटणी करणे.
3. म.न.पा शाळा, उद्याने, वाचनालये, अध्ययन कक्ष व अन्य इमारतीवर निघालेली अनावश्यक झाडे झुडपी काढणे व त्याची विल्हेवाट लावणे.

तथापी या प्राथमिक जबाबदारा—या व्यतिरीक्त वर्षभरात येणा—या वादळ वा—यामुळे विशेषतः फरवरी ते मे महीना व मान्सुम पुर्व कालावधी तसेच सप्टेबंर/ऑक्टोबंर मध्ये अवकाळी पाऊस व वादळामुळे शहरातील सार्वजनीक स्थळी व खाजगी परीसरामध्ये वृक्ष उन्मळुन व वृक्षांच्या फांद्या तुटून पडण्याचे प्रमाण अत्याधिक असते. अशा आणिबाणी प्रसंगी सद्यास्थितीत उद्यान विभागाकडे असलेली यंत्रणा ही अपुरी ठरते व परिणामी नागरीकांचा रोष पत्करावा लागतो.

त्यामुळे अश्या आपातकालीन व आणिबाणीच्या परिस्थितीच्या सामना करण्याकरीता उद्यान विभागाकडे केंद्रीय व क्षेत्रीय स्तरावर विकेंद्रीत केलेली सक्षम यंत्रणा असणे आवश्यक आहे. या जाणीवेतुन व गरजेतुन केंद्रीय स्तरावर व प्रत्येक क्षेत्रीय स्तरावर बाहय स्त्रोताव्दारे कुशल व अकुशल मजूर नेमुण वाहनाव्दारे वृक्षांच्या फांद्या पालापाचोळा, लाकडे व मोठी झाडे वाहुन नेण्याकरीता व विल्हेवाट लावण्याकरीता यंत्रणा उभारण्याची बाब विभागाच्या विचाराधीन होती. त्यानुसार केंद्रीय व क्षेत्रीय स्तरावर वर नमुद आणिबाणीच्या प्रसंगी परिस्थीती हाताळण्याकरीता व कार्यालयास प्राप्त तक्रारीचे निराकरण करण्याकरीता विभागाने एकुण रूपये **1,08,43,493/—**चे प्राकलन तयार केले असुन त्यास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे, व लघु आवेदन/निवीदा मागविण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**